सकाळ दि० २४।११।१८

# गाइडकडे आता पीएचडीचे आठच विद्यार्थी

## विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन नियमाचे बंधन

**अमरावती, ता. २३ :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील पीएचडीचे मार्गदर्शक स्वतःकडे अनेक विद्यार्थी घेत असत; आता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन नियमानुसार त्यांना केवळ आठच विद्यार्थी मार्गदर्शनासाठी घेता येणार आहेत.



विद्यापीठ अनुदान आयोगाने पीएचडीसाठीची नियमावली कडक केली. यामध्ये सेमिनार, कोर्स वर्क आणि पूर्वपरीक्षेसह गाइडवरही बंधन करण्यात आले आहे. यापूर्वी विद्यापीठातील गाइड असलेल्या प्राध्यापकाने आठच संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे, असा नियम होता; परंतु या नियमाला तिलांजली देऊन गाइड हा आपल्याकडे २० ते ३० विद्यार्थी संशोधनाच्या मार्गदर्शनासाठी घेत असत. काहींचा हा आकडा शंभरावर जात होता. यामुळे एक गाइड एवढ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कसे करू शकतो; असा प्रश्न उपस्थित केला जात होता. हीच बाब यूजीसीच्याही निदर्शनास आली. यूजीसीने आता पीएचडीचा गाइड हा पदव्युत्तर पदवीलाच शिकविणारा असावा, तो विद्यापीठ परिसरातील असावा असा नियम केला. त्यामुळे आता इतर विद्यापीठांतील शिक्षकाला गाइड म्हणून आरआरसीला मान्यता देता येणार नाही. यापूर्वी हे गाइड इतर विद्यापीठातही गाइड म्हणूनच काम करीत होते. त्यामुळे प्रत्येक विद्यापीठातील आठ आठ विद्यार्थी त्यांच्याकडे पीएचडीसाठी मार्गदर्शनाला येत. हा आकडा वाढत असायचा. परंतु आता विद्यापीठ अनुदान आयोगाने नियमावली कडक केल्याने कोणत्याही गाइडकडे आठपेक्षा जास्त विद्यार्थी आरआरसीला पीएचडी संशोधनासाठी देता येणार नाहीत.